Indian Streams Research Journal
Volume I, Issue. XI,Dec, 2011
**ISSN:-2230-7850**

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# शिक्षक विचार प्रक्रिया व प्रतिमान

विवेक गं . इनामदार

स . से . सं . अध्यापक महाविद्यालय,
विष्णुपुरी नांदेड .

## *प्रस्तावना :–*

अध्यापन ही शिक्षण प्रक्रियेतील एक अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे . अध्यापनावरच अभ्यासक्रमाच्या उद्दिष्टांची साध्यता अवलंबून असते . अध्यापन ही कला आहे की शास्त्र हा वाद संपुष्टात आला असला तरी शिक्षकाचे व्यक्तीमत्व आणि व्यवसायासाठी अध्यापन अत्यंत महत्वाचे आहे . अध्यापनासाठी शिक्षकास अनेक बाबींचा विचार करावा लागतो . त्यासाठी शिक्षकाची विचार प्रक्रिया अत्यंत व्यवस्थित असणे नितांत गरजेचे आहे . 'व्हाइट' नावाच्या विचारवंताच्या मतानुसार अध्यापनाचा निश्चित असा कोणताही फॉर्म्युला देता येणार नाही . हे मत बनण्याचे कारण अध्यापनाच्या पाठीमागे कार्यरत असलेली शिक्षक विचार प्रक्रिया होय . या विचार प्रक्रियाचा अभ्यास होणे आवश्यक आहे .

अभ्यासक्रमासंबंधातील संशोधनातून असे आढळले आहे की प्रभावी अध्यापनासाठी किंवा अध्यापनात सुधारणा करण्यासाठी फक्त अभ्यासक्रमात सुधारणा करणे पुरेसे नसते तर ज्या शिक्षकांना अभ्यासक्रम राबवायचा आहे त्यांच्या अव्यक्त समजुती विचारप्रक्रियांचा परिणाम अध्यापनावर होत असतो . त्यामुळे विचार प्रक्रिया समजून घेतल्याशिवाय केवळ अभ्यासक्रम बदलून अध्यापनात अपेक्षित सुधारणा करणे शक्य नाही शिक्षक विचार प्रक्रियेचा अभ्यास करण्यासाठी आज काही प्रतिमान विकसित झालेले आहेत . त्यामध्ये क्लर्क व पीटरसन यांनी शिक्षक विचार प्रक्रियेतील विविध घटकांचा अभ्यास करून एक प्रतिमान सुचविले आहे .

या प्रतिमानात पहिले विचार प्रक्रिया व दुसरे कृती अशी दोन क्षेत्रे आहेत . पहिले क्षेत्र हे सहज निरीक्षणक्षम व मापनक्षम नाही . शिक्षकांचे नियोजन करीत असतानाचे विचार शिक्षक प्रत्यक्ष अध्यापन करीत असतानाचे आंतरक्रियात्मक विचार व निर्णय आणि शिक्षकांच्या उपपत्ती हे तीनही घटक परस्पर संबंधित व परस्परावलंबी आहे .

दुसरे क्षेत्र कृती व दृश्य परिणामाचे आहे . याबाबत केलेल्या संशोधनातून काही महत्वाची तत्वे मिळाली आहेत . उदा . अग्रत संघटकामुळे नवीन माहिती आत्मसात होण्यास मदत होते . प्रश्नानंतर पूरेसा वेळ थांबणे हे प्रश्नाच्या आकलनास पूरक ठरते . त्यासारखी तत्वे शिक्षक विद्यार्थी आंतरक्रिया या संदर्भात प्रकाश टाकतात .

या दोन्ही क्षेत्रामधील कृतीमधून शिक्षकांच्या विचार प्रक्रिया व कृती यातील परस्परसंबंध लक्षात येतो . शिक्षक कृतीवर शिक्षक विचार प्रक्रियेचा परिणाम होतो . त्याच बरोबर अध्यापन प्रक्रियेतील अडचणी व संधी यांचाही विचार अध्यापन प्रक्रियेचे आकलन होण्यासाठी करावा लागतो . शाळा मुख्याध्यापक समाज अभ्यासक्रम साधन सुविधा इत्यादींच्या संदर्भात शिक्षकाला अडचणी जाणवतात . त्यामुळे काही विशिष्ट प्रकारच्या कृती करता येत नाहीत . त्या अडचणींचा शिक्षकांच्या विचार प्रक्रियेवर प्रभाव पडतो . शिक्षक अशा अडचणींचा विचार जास्त करतो की, त्यातून मिळणा-या संधीचा यावरही अध्यापन प्रक्रियेची परिणामकारकता अवलंबून असते .

शॉवेलसन यांनी शिक्षकांच्या आंतरक्रियात्मक विचार व निर्णया विषयी प्रतिमान मांडलेले आहे . शिक्षक सामान्यतः नेहमीच्या पध्दतीने आंतरक्रिया साधतात . बाह्य सूचकांमुळे त्यांना त्या पध्दतीत बदल करावे लागतात व निर्णय घ्यावे लागतात .

क्लर्क पिटरसन व शॉवेलसन – स्टर्न यांनी मांडलेल्या दोन्ही प्रतिमानात शिक्षक विचार करतात व निर्णय घेतात त्यावेळी त्यांना विद्यार्थ्यांकडून मिळणारा प्रतिसाद संकेत कारणीभूत होतात हे गृहितक आहे . परंतू प्रत्येक वेळी गृहितक खरे ठरेलच असे नाही . कारण शिक्षकांच्या विचार व निर्णय प्रक्रियेला वातावरण, बैठक व्यवस्था, प्रकाश योजना, स्वत: चे मत अशी कारणेही असू शकतात .

शिक्षक विचार प्रक्रियेबद्दल माहिती मिळविण्यासाठी काही तंत्रे आहेत . जसे प्रकट विचार उद्दिपित प्रत्यावहन धोरणविषयक माहितीचा प्राप्ती शिक्षकांची

**Please cite this Article as :** विवेक गं . इनामदार , शिक्षक विचार प्रक्रिया व प्रतिमाने : **Indian Streams Research Journal (Dec. ; 2011)**

रोजनिशी माहितीसंच अशाप्रकारे या विविध तंत्राचा वापर करून शिक्षकांच्या विचार प्रक्रियेसंबंधी माहिती मिळविता येते .

एक यशस्वी शिक्षक तयार करण्यासाठी केवळ शिक्षकाच्या बाह्य वर्तनाला वळण लावणे पुरेसे नाही तर त्यांच्या विचार प्रक्रिया व निर्णय क्षमतेलाही योग्य दिशा देणे गरजेचे आहे . त्यासाठी शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमात काही गोष्टींचा अंतर्भाव करणे गरजेचे आहे . शिक्षण प्रक्रियेच्या कार्यक्रमात अनेक उपायांच्या साह्याने शिक्षक विचार प्रक्रियेत निर्णयक्षमतेवरील आधारित प्रशिक्षणाने संक्रमणाच्या समस्येवर मात करता येईल .

शिक्षकांची विचार प्रक्रिया व निर्णय प्रक्रिया जाणून घेऊन त्यानुसार प्रशिक्षण कालावधीत शिक्षकांच्या निर्णयक्षमतेला योग्य मार्गदर्शन मिळाले तर शिक्षकांचे अध्यापन केवळ बाह्य वर्तनातूनच परिणामकारक बनेल असे नव्हे तर त्यांची विचार प्रक्रिया व निर्णयशक्ती देखील परिणामकारक अध्यापनास पुरक ठरेल .

या सर्व दृष्टीने विचार करता शिक्षकाच्या विचार प्रक्रियेस चालना देणे महत्वाची बाब सिध्द होते . ज्याकडे संपूर्ण शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमात दुर्लक्ष होतांना आढळते . विद्यार्थ्यांच्या विचाराला पहिल्यांदा धार प्राप्त करून देणे अगत्याचे आहे त्यासाठी आधुनिक संशोधने व प्रतिमानांसारख्या बाबींचा समर्थपणे उपयोग होणे आवश्यक वाटते .

संदर्भ : -

**1** . नीलिमा सप्रे व प्रीती पाटील **2005** , 'शिक्षणातील विचार प्रवाह', फडके प्रकाशन ,कोल्हापूर .
**2** . वासंती फडके **1995** ,'अध्यापनाची प्रतिमाने ', नुतन प्रकाशन ,पुणे .
**3** . ह . ना . जगताप **2006** , 'शिक्षणातील नवप्रवाह व नवप्रवर्तने' ,नित्य नूतन प्रकाशन ,पुणे .